# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०९/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## अल्पवयीन अपह्वत मुलीचा घेतला शोध

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक १९/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे दाखल गुन्हा क्र. ४१/२०२४ कलम ३६३, ३७० भादंवि गुन्ह्याचे तपासात ०७ महीने पुर्ण होवुनही यातील अल्पवयीन अपह्वत मुलीचा आणि संशयीत आरोपीचा शोध शोध न लागल्याने मा. पोलीस अधिक्षक साहेब, नागपुर जिल्हा नागपुर ग्रामीण यांनी अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांना सदर गुन्हयाचा तपास करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण येथील स्टाफ यांना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून अल्पवयीन अपह्वत मुलीचा व आरोपीचा कसोशीने शोध घेतला असता अल्पवयीन अपह्वत मुलगी व **आरोपी नामे— सोनु प्रेमसिंह चित्तोडीया वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, हेटीटोला मनसर ता. रामटेक जि. नागपूर** हे देवलापार येथे मिळुन आले. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ तसेच अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष ना.ग्रा. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोनि किशोर नगराळे व त्यांचे पथक मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोहवा ललीत उईके, पोना सतीश राठोड, चापोहवा मनोज मेंढुले यांनी केलेली आहे.

# जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा वाहीटोला शिवार रामटेक येथे आयशर ट्रक क्र क्र एम एच. ४०/सी.डी. ४०३७ मध्ये जनावरांची अवैध वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून मौजा वाहीटोला शिवार रामटेक येथे पेट्रोलींग दरम्यान ट्रक क्र क्र एम एच. ४०/सी. डी. ४०३७ यास गाडी थांबवुन विचारपुस केली असता आरोपी क्र ०१) आयशर ट्रक क्र एम एच. ४०—सी.डी. ४०३७ मोहसीन मुजफफर खान २) अनिल हौसलाल उके दोन्ही रा. चंगेरा रजेगाव तह. जि गोंदिया हे आयशर गाडीच्या डाल्यात ०१) पांढ—या रंगाचे ०६ बैल किमंती ८४,०००/— २) घमना लाल रंगाचे ०२ बैल किमंती ३०,००० असे एकुण ०८ बैल जनावरे एकुण किमंती ११,४०,०००/— रु ची जनावरांची अवैध वाहतूक करताना मिळुन आल्याने सदर आयशर चालकास जनावरे वाहतुकीचा परवाना बाबत विचारपुस केल्यास परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. आरोपीतांविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ११(१)(डी) प्रा. छळ. प्रति अधि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपींतांकडुन गुन्हयात वापरलेला टाटा कंपनीचा आयशर ट्रक क्र MH-40-CD-4037 किमंती २५,००,०००रु मध्ये ०१) पांढ—या रंगाचे ०६ बैल किमंती ८४,०००/— २) घमना लाल रंगाचे ०२ बैल किमंती ३०,००० असे एकुण ०८ बैल जनावरे एकुण किमंती ११,४०,०००/— रु. असा एकुण २६,१४,०००/— रूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोहवा शाम रामटेके, पोअं. शिवशंकर भोयर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर